“ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान” या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायत अंतर्गत कामांची व्याप्ती वाढवून सुधारित निधी मंजूर करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः .जनसु-२०१७/प्र.क्र.१११/यो-०६**

बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई-४००००१

दिनांक: २५ जानेवारी ,२०१८

**वाचा :-**

१) **ग्रा.वि.व.ज.सं.वि.शासन निर्णय क्र.ददभू-२०१५/प्र.क्र.६२/यो-६,दि.१६.९.२०१०**

२) **ग्रा.वि.व.ज.सं.वि.शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१३/प्र.क्र.१८९/पंरा-७,दि.३०.१.२०१४**

३) **ग्रा.वि.व.ज.सं.वि.शासन शुध्दीपत्रक क्र.जनसु-२०१६/प्र.क्र.२१०/यो-०६ दि.०३.०१.२०१७**

**प्रस्तावना:-**

दहन / दफनभूमी व इतर कार्यक्रम ही जिल्हा स्तरीय योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत “ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान” याबाबत दि.१६.९.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयान्वये यास योजनेत दहन व दफनभूमी व इतर कामाच्या विकासासांठी रू.१०.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाच्या दि.३१.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये रू.१२.०० लक्ष इतका निधी मंजुर करण्यात आलेला आहे. तथापि, आजच्या वाढत्या महागाईच्या काळात मजूरी,बांधकाम साहित्य इ.चे वाढलेल्या दरांमुळे ठरवून दिलेल्या मर्यादेमध्ये दहनभूमी,दफनभूमी इ.चे बांधकाम पूर्ण करणे शक्य होत नसल्याने निधीअभावी सदर कामे अपूर्ण राहतात. त्यामुळे याबाबत मा.लोकप्रतिनिधींनीकडून खर्चाची मर्यादा वाढविण्याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे. तसेच शासनाचे दि३.१.२०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये जनसुविधा योजनेतंर्गत कामांची व्याप्ती वाढविण्यात आली असून सदर कामांना खर्चाची मर्यादा लागू करण्यात आली नव्हती. तरी या बाबी विचारात घेवुन या योजनेंतर्गत कामांच्या खर्चाची मर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान या जिल्हास्तरीय योजनेंतर्गत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेल्या कामांसाठी खालीलप्रमाणे सुधारित निधी मंजूर करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.तसेच अ.क्र. १ (ड) येथील बाबींचा सदर योजनेंतर्गत नव्याने समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामे | खर्चाची मर्यादा (रक्कम रू.लाखात) |
|---|---|---|
| १.(अ) | **ग्रामीण भागात दहन/दफन भूमीची व्यवस्था करणे,त्या सुस्थितीत ठेवणे व त्याचे नियमन करणे यासाठी स्मशान भूमीवर हाती घ्यावयाची कामे:-**<br>१) दहन/दफन भूसंपादन<br>२) चबुतऱ्याचे बांधकाम<br>३) शेडचे बांधकाम<br>४) पोहोच रस्ता<br>५) गरजेनुसार कुंपण वा भिंती घालुन जागेची सुरक्षितता साधणे<br>६) दहन/दफन भूमीत विद्यूतीकरण व आवश्यकतेनुसार विद्युतदाहीनी /सुधारित शवदाहीनी व्यवस्था<br>७) पाण्याची सोय<br>८) स्मशान घाट/नदीघाट बांधकाम(स्मशान व्यवस्थेसाठी आवश्यक तेवढे)<br>९) जमीन सपाटीकरण व तळफरशी<br>१०) स्मृती उद्यान | २०.०० |
| १. (ब) | **ग्रामपंचायत भवन/ कार्यालय याबाबत हाती घ्यावयाची कामे:-**<br>१) नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम व इमारती अंतर्गत सुविधा<br>२) जुन्या ग्रामपंचायत इमारतीची पुनर्बांधणी /विस्तार<br>३) ग्रामपंचायतीच्या आवारामध्ये वृक्षारोपण ,परिसर सुधारणा,परीसराला कुंपन घालणे व इतर अनुषंगीक कामे | २०.०० |
| १.(क) | **जनसुविधा योजनेंतर्गत कामांची व्याप्ती वाढविणे:-** | |
| | १) ग्रामपंचायत हद्दीत आठवडी बाजार केंद्र विकसित करणे | १५.०० |
| | २) गावतलावातील गाळ काढुन गावतलावांचे सुशोभीकरण करणे | १५.०० |
| | ३) घनकचरा व्यवस्था करणे | २०.०० |
| | ४) भूमीगत गटार बांधणे | १५.०० |

| अ.क्र. | कामे | खर्चाची मर्यादा (रक्कम रू.लाखात) |
|---|---|---|
| | ५) ग्रामपंचायत हद्दीमध्ये अस्तित्वात असलेल्या विहीरींवर सौरऊर्जेवर आधारित दुहेरी हातपंप बसविणे तसेच जलशुध्दीकरण आर ओ प्लांटची व्यवस्था करणे | २०.०० |
| १.(ड) | **जनसुविधा योजनेंतर्गत घेण्यात येणारे रस्ते**<br>१) गावांतर्गत रस्ते<br>२) एका वस्ती/पाड्यापासून दुस-या वस्ती /पाड्यापर्यंत जोड रस्ता बांधणे | २०.०० |

२. या योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणारे कामे अन्य योजनेमधून प्रस्तावित करण्यात येवू नयेत.तसेच उपरोल्लिखित व्यतिरिक्त सर्व बाबी संदर्भांकित (१) वरील शासन निर्णयाप्रमाणेच असतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२५१३१८२८२९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay G Chandekar

Digitally signed by Vijay G Chandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6c45102bd1a0b53d3ebeac67e146b5762d1a4e7c6fc72cf34367b3943718b2a4, cn=Vijay G Chandekar
Date: 2018.01.25 13:33:43 +05'30'

( वि.गो.चांदेकर )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.मंत्री व मा.राज्यमंत्री(सर्व)यांचे खाजगी सचिव
४. मा.विधानसभा व मा.विधानपरिषद सदस्य
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
६. विधानमंडळ ग्रंथालय,विधानभवन,मुंबई(१० प्रती)
७. माहिती व जनसंपर्क संचालनालय
८. सर्व मंत्रालयीन विभाग

९. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता) एक,महाराष्ट्र,मुंबई
१०.महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)दोन,महाराष्ट्र,नागपूर
११.महालेखापाल(लेखा परिक्षा) एक,महाराष्ट्र,मुंबई
१२.महालेखापाल(लेखा परिक्षा) दोन,महाराष्ट्र,नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.सर्व सहसचिव/उपसचिव,ग्रामविकास व जलसंधारण विभाग
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१७.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१८.नियोजन विभाग (कार्यासन १४८१)
१९.ग्राम विभागातील सर्व कार्यासने
२०.निवड नस्ती,कार्यासन योजना ६, ग्रामविकास व पंचायत राज विभाग.